सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

**उद्योजकता विकास केंद्र**

**Interview with Entrepreneurs**

# अहवाल

दिनांक २० फेब्रुवारी २०२३ रोजी सदगुरु गाडगे महाराज कॉलेज मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योजकता विकास केंद्रा मार्फत उद्योजकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून कराड अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेचे सी.ई.ओ,मा.दिलीप गुरव हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. मोहन राजमाने हे होते. प्रमुख पाहुणे मा. दिलीप गुरव यांनी त्यांच्या भाषणात उद्योग उभारत असताना कोणकोणत्या अडचणी येतात व त्यावरती कशी मात करायची याचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते. त्यामध्ये वेल्फेअर मेडिसिन शॉपीचे मालक मा. विशाल सूर्यवंशी, त्रिमूर्ती इंजिनिअरिंग वर्क्सचे प्रमुख विजय साळुंखे, ओरेक्सो लाईफ सायन्स चे मालक मा. सयाजी पवार, भात शेती ऍग्रो चे मालक मा.अभिजीत माने आणि अटके गावचे प्रगतशील शेतकरी मा. विकास साळुंखे यांनी त्यांच्या मुलाखती मधून विद्यार्थ्यांना उद्योजकतेबद्दल मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. मोहन राजमाने यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ४०० हुन अधिक विध्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. ए. पाटील, प्रा. नेताजी सूर्यवंशी, प्रा. माधुरी कांबळे, रुसा समन्वयक, प्रा. डॉ.यु.बी मोरे तसेच रजिस्ट्रार आर. वाय. गायकवाड व इतर मान्यवर उपस्थित होते. उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. सतीश पार्टे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर प्रा. प्राध्यापिका शर्मिला पाटील यांनी सूत्रसंचालन केले व प्रा. डॉ. सचिन यादव यांनी आभार मानले.

| | |
|---|---|
| **समन्वयक** | **प्राचार्य** |
| **उद्योजकता विकास केंद्र** | **स.गा.म कॉलेज, कराड** |




SGM








SGM


Mr. Vijay Salunkhe
Trimurti Engineering Works,


SGM


SGM

